
# व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

## मराठी विभाग

## वार्षिक अहवाल- २०१८ - १९


माहे ऑगस्ट २०१८ मधील विविध शैक्षणिक, शिक्षण पूरक व इतर उपक्रमांचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**१. अतिथी व्याख्यान :-**



वाङमय मंडळाच्या वतीने आयोजीत उपक्रमात 'लघुकथेचे स्वरूप' या विषयावर विषय मांडणी दि. १९ जुलै रोजी डॉ. प्रशांत चौधरी यांनी केली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी भूषविले.

**२. भित्तिपत्रक अनावरण :-**




दि. २३ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून विभागतील विद्यार्थिनी कु. गीताश्री वाघमोडे, कु.गुलाबशहा शेख, कु. काजल कोंडेकर व विद्यार्थी अमोल डोके व संतोष चव्हाण यांनी विद्यापीठ गीत व प्रवेशद्वार या संकल्पनेवरील भित्तिपत्रक तयार केले, ज्याचे अनावरण मा. प्राचार्या डॉ. अनार साळुंके यांनी केले. तसेच याच दिवशी कु. शुभांगी शेरखाने या विद्यार्थिनीनेही तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले.

**३. मराठी सामान्य ज्ञान परीक्षा :-**

दि. २० रोजी बी.ए., बी.एस्.सी. द्वितीय वर्ष प्रथम भाषा व बी.ए. द्वितीय वर्ष ऐच्छिक या वर्गांवर ही सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आली. एकूण २५ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदवला.

## ४. भारतीय संस्कृती परीक्षा :-




विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या भारतीय संस्कृती परीक्षेचे हे दुसरे वर्ष. सदरील परीक्षांच्या संयोजनासाठी महाविद्यालयातील मराठी विभाग केंद्रास सहकार्य करत असतो. या वर्षी ही परीक्षा रविवार दि. १९ रोजी संपन्न झाली. एकूण १३ विद्यर्थ्यांनी सहभाग घेतला.


## ५. घटक चाचणी :-

दि. १३ व १४ ऑगस्ट दरम्यान बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विविध अभ्यासपत्रिकांवर घटक चाचणी घेण्यात आली. २० गुणांची प्रश्न पत्रिका काढण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तर पत्रिकांचे मूल्यमापन करण्यात येवून विद्यार्थ्यांना आवशक त्या सूचना देण्यात आल्या.


## ६. अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर

बी.ए. प्रथमवर्षास असणाऱ्या 'मुलगी झाली हो' या ज्योती म्हापसेकर यांच्या एकांकीकेचा प्रत्यक्ष प्रयोग स्मार्ट बोर्डवर दाखविण्यात आला. यामुळे सदरील एकांकीका समजण्यास मदत झाली. याशिवाय वर्षभरात स्माटबोर्ड व मोबाईलच्या माध्यमातून अनेक नाटके तसेच इतर अभ्यासपूरक माहिती विविध वर्गांच्या विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.





## ७. विविध उपक्रमात विद्यार्थी सहभाग




• उस्मानाबाद येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय एकांकीका स्पर्धांसाठी राज्यभरातून नामवंत संघ उस्मानाबादेत आले होते. प्रत्यक्ष रंगभूमीवर साकार होणारा नाट्यानुभव अनुभवण्याची संधी या निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थीनींना मिळाली.

• लातूर येथील दयानंद महाविद्यालयात संपन्न झालेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या प्रतिभासंगम या साहित्य संमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

• उस्मानाबाद येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने आयोजीत नाट्य उतारा सादरिकरण व काव्यवाचन स्पर्धेत महाविद्यालयातील दोन विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

## ८. कार्यशाळांचे आयोजन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या अर्थ सहाय्याने दि. ०३ व ०४ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयात 'नवोदित लेखकांसाठी कार्यशाळा' व 'नाट्लेखन तंत्र प्रशिक्षण कार्यशाळा', या दोन कार्यशाळांचे आयोजन केले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन प्रख्यात कवी प्रा. डॉ. दासू वैद्य यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर मनोगतात डॉ. वैद्य यांनी साहित्य प्रक्रियेच्या निर्मितीचा प्रवास नेमक्या शब्दांमधून उलगडून दाखविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव ॲड. मिलींद पाटील हे होते. या प्रसंगी कवि राजेंद्र अत्रे यांच्यासह संस्थेचे कोषाध्यक्ष शेषाद्री डांगे व कमलाकर पाटील यांची प्रमुख उपस्थीती होती.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी कथात्मक साहित्याचे स्वरूप व लेखनतंत्र हा विषय सोलापूर येथील डॉ. सुहास पुजारी यांनी मांडला. या सत्राच्या अध्यक्ष स्थानी डॉ. शिवाजीराव देशमुख यांची उपस्थिती होती. पुढील सत्र बीड येथील प्रा. डॉ. विद्यासागर पाटांगणकर यांनी घेतले. 'वैचारिक साहित्याचे लेखन' हा विषय त्यांनी विविध संदर्भ देत स्पष्ट केला. श्रीमती कमलताई नलावडे या सत्राच्या अध्यक्षस्थानी होत्या.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी सोलापूर येथील नाटककार रजनीश जोशी यांनी 'नाट्यलेखन तंत्र' हा विषय विस्ताराने मांडला. तर प्रख्यात नाटककार शिरीष देखणे यांनी 'साहित्य कृतींच्या माध्यमांतर प्रक्रियेचे स्वरूप' उलगडून दाखवले.

लातूर येथील नाट्यप्रशिक्षक कल्याण वाघमारे यांनी 'नाट्यसंहिता व तिचे सादरीकरण' हा विषय कृतिसत्रात रंजकतेने हाताळला. गुजोटी येथील प्राध्यापक प्रमोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेले हे कृतिसत्र संस्मरणीय ठरले. कार्यशाळेचा समारोप प्रा. प्रमोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाने झाला. प्रा. डॉ. प्रशांत चौधरी व प्रा. डॉ. सहदेव रसाळ यांनी या कार्यशाळांचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

या कार्यशाळेस रामकृष्ण परमहंस विद्यालय उस्मानाबाद, महिला महाविद्यालय उस्मानाबाद, जनता महाविद्यालय येडशी, शंकरराव पाटील महाविद्यालय भूम, तेरणा महाविद्यालय उस्मानाबाद इत्यादी महाविद्यालयातील १३२ विद्यार्थी-विद्यार्थीनींनी पूर्ण वेळ सहभाग दिला.

**९. राजभाषा मराठी गौरव दिन**

प्रख्यात कवी तथा नाटककार वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जयंती दिन दि. २७ फेब्रुवारी हा राजभाषा मराठी गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी 'म्हणी व सुलेखन स्पर्धा' आयोजीत करण्यात आली. तसेच कुसुमाग्रजांच्या विविध कवितांचे वाचन विद्यार्थी व शिक्षकांनी केले.

संस्थेच्या मार्गदर्शिका श्रीमती रेखाताई महाजन यांच्या हस्ते व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनार साळुंके यांच्या उपस्थितीत गौरव दिनाच्या निमित्ताने तयार केलेल्या भित्तीप्रत्रकाचे अनावरण करण्यात आले.

डॉ. प्रशांत चौधरी
विभाग प्रमुख

डॉ. सहदेव रसाळ
सहाय्यक प्राध्यापक

प्राचार्य
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
उस्मानाबाद ४१३५०१

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय
कार्यालय
उस्मानाबाद